महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४४७५/४१०/४६५/४९२

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/संस्थास्तरिय प्रवेश/३६० दिनांक : ०५/०८/२०२५

## प्रवेशासाठीची सुचना
## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संस्थास्तरीय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश
## प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभ्यासक्रम

संदर्भ: संचालनालयाचे प्रवेशासाठीचे वेळापत्रक क्र: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२५/कॅप फेरी/२७०, दिनांक : २६/०६/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी संचालनालयाने संदर्भीय वेळापत्रकाद्वारे सविस्तर माहिती प्रसिद्ध केलेली आहे.

प्रवेशासाठीची ही सुचना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संस्थास्तरीय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेशाबाबत स्पष्टता देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अक्र. | संस्थास्तरीय प्रवेशाकरिता संस्थेने करावयाची कार्यवाही | सुरुवात दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संस्थास्तरिय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर दि. ०७-०८-२०२५ पर्यंत प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर नोंदणी करणाऱ्या आणि प्रवेशासाठी संस्थांनी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक. | ०७-०८-२०२५ | |
| २ | संचालनालयाकडुन प्राप्त होणा-या तसेच संस्थेकडे दि. ०७-०८-२०२५ पर्यंत प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी नियम क्र. १३ नुसार प्रसिद्ध करणे तसेच रिक्त जागांची यादी संस्थेने प्रसिद्ध करणे. | ०८-०८-२०२५ | |
| ३ | **अनुक्रमांक २ नुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार संस्थास्तरीय कोटयातील जागांवरील प्रवेश.-**<br>• संचालनालयाद्वारे संस्थेच्या लॉगिन मध्ये प्राप्त होणारी माहिती व संस्थेकडे उमेदवारांकडून प्राप्त होणारे अर्ज यांची गुणवता यादी संस्थेद्वारे तयार करण्यात येऊन संस्था पूर्ण शुल्क परताव्याचा प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत संस्थास्तरिय जागांवर नियम क्र. १३ व १५ नुसार प्रवेश करावेत.<br>• जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला तर, ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे ती संस्था उमेदवारास एक हजार रुपये वजा करून पूर्ण शुल्क परत करेल. | ०९-०८-२०२५ | १२-०८-२०२५ |
| ४ | **अनुक्रमांक ३ नुसार संस्थास्तरिय प्रवेश प्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश.-**<br>• उपरोक्त ३ मध्ये नमुद केल्यानुसार प्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर दि. १३-०८-२०२५/दि. १४-०८-२०२५ पर्यंत प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर नोंदणी करणा-या व अर्ज निश्चित करण्या-या व संस्थेकडे अर्ज सादर करणा-या उमेदवारांचे प्रवेश नियम क्र. १३ नुसार संस्थांनी करावेत. (संचालनालयाकडुन संस्थेच्या लॉगिनमध्ये नव्याने कोणतीही यादी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.)<br>• या कालावधीत, जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला, तर ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे त्या संस्थेकडून सुरक्षा ठेव आणि सावधता रक्कम वगळता उमेदवाराला त्याच्या कोणत्याही शुल्काचा परतावा मिळणार नाही. | १३-०८-२०२५ | १४-०८-२०२५ |
| ५ | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | १४-०८-२०२५ | |
| ६ | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | १४-०८-२०२५ | |

### सर्वसाधारण टिप:

१. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात.

२. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.
३. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
४. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://poly25.dtemaharashtra.gov.in** संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.
५. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.
६. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.
७. मदतकक्ष क्रमांक **+91 7669100257 / 18003132164** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई